**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ______________________
   (Name) ______________________

2. (Signature) ______________________
   (Name) ______________________

**OMR Sheet No. :** ..............................................
(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | |
(In figures as per admission card)

**Roll No.** ______________________
(In words)

**Test Booklet No.**

**D—3808**

**PAPER—II**

# MARATHI

**Time : 1¼ hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **16** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the question booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered in the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ⬬ (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the Answer Sheet given **inside the Paper I booklet only**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is NO negative marking.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं। आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** (A) (B) ⬬ (D)

   जबकि (C) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये** उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं। यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते है, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर उत्तर-पुस्तिका निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तर के लिए अंक नहीं काटे जायेंगे।**

# MARATHI
# मराठी
## PAPER – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty** (50) objective-type questions, each question carrying **two** (2) marks. Attempt **all** of them.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास (50)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडवा.

**1.** मराठी संस्कृती आणि विठ्ठलभक्ती यांच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असा 'पंढरपूरचा चौऱ्यांयशीचा शिलालेख' कोणत्या शकातील आहे?

(A) शके 1195-99 (B) शके 1227

(C) शके 1219 (D) शके 1271

**2.** उष्णोदकाचे झरे असल्याने ज्या स्थानाला उन्हकदेव असे नाव पडले तो उन्हकदेवाचा शिलालेख कोणत्या शकातील आहे ?

(A) शके 1201 (B) शके 1174

(C) शके 1172 (D) शके 1170

**3.** ''वैन्यागंगेचिये तीरीं। मनोहर अंबानगरी। तेथे प्रकटले श्रीहरी। जगदीश्वरू।।'' असा उल्लेख कोणी केला आहे ?

(A) भास्करभट्ट बोरीकर (B) मुकुंदराज

(C) नरेन्द्र (D) सामराज

**4.** ''जाट याचा वंश निर्मूल करीन, कुंभारी खणून यमुनेत टाकीन तरीच बापाचे पोटीं जन्म घेतला'' हे उद्‌गार कोणत्या बखरीतील आहेत?

(A) भाऊसाहेबांची बखर (B) पेशवे बखर

(C) शिवदिग्विजयाची बखर (D) भोसले वंश चरित्र

5. ''राजाराम प्रजा सुखी राखील. आपणांपेक्षा याचा पराक्रम होईल, नांवाची कीर्ति बहुत होईल. आपलें नाव रक्षील तर एवढाच रक्षील.'' हे भविष्य कोणत्या बखरीतील आहे?

(A) सभासदाची बखर
(B) राक्षेसतागडीची बखर
(C) शालिवाहनाची बखर
(D) सप्तप्रकरणात्मक चरित्र

6. ''सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची। कंठी झळके माळ मुक्ताफळांची'' – हे स्वरूप वर्णन कोणत्या दैवताच्या आरतीतील आहे?

(A) गणपती
(B) मारुती
(C) म्हसोबा
(D) खंडोबा

7. 'चिमणीचं घर होतं मेणाचं' हे कशाचे शीर्षक आहे?

(A) विंदा करंदीकरांचे बालगीत
(B) विजय तेंडुलकरांचे नाटक
(C) मेघना पेठे यांची कथा
(D) माधवी देसाई यांचे आत्मचरित्र

8. 'प्राकृत प्रस्थानत्रयी' असे पुढीलपैकी कोणत्या ग्रंथ–समुच्चयास म्हटले जाते?

(A) 'ज्ञानेश्वरी', 'भावार्थ रामायण', 'तुकाराम गाथा'
(B) 'अमृतानुभव', 'एकनाथी भागवत', 'तुकाराम गाथा'
(C) 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत', 'तुकाराम गाथा'
(D) 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत','नामदेव गाथा'

9. ''रूपवादी समीक्षा साहित्यकृतीला स्वयंपूर्ण वस्तू मानते. तिचा वाचकावर होणारा संस्कार साहित्यबाह्य आहे, अशी भूमिका ती घेते.''

(A) वरील विधानातील पहिले वाक्य चुकीचे असले तरी दुसरे बरोबर आहे.

(B) वरील विधानातील पहिले वाक्य बरोबर आहे, परंतु दुसरे चुकीचे आहे.

(C) वरील विधान पूर्णतः चुकीचे आहे.

(D) वरील विधान संपूर्णपणे बरोबर आहे.

10. पुढीलपैकी कोणत्या गटातील सर्व नाटके दत्ता भगत यांनी लिहिलेली आहेत ?

(A) 'वाटा-पळवाटा', 'अश्मक', 'आवर्त'

(B) 'युगयात्रा', 'अश्मक', 'आवर्त'

(C) 'वाटा-पळवाटा', 'युगयात्रा', 'आवर्त'

(D) 'वाटा-पळवाटा', 'अश्मक', 'युगयात्रा',

11. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात काही मराठी वृत्तपत्रीय लेख फार गाजले होते. असे काही लेख पुढे दिले आहेत. त्यांच्या व लेखकांच्या जोड्या लावा.

| | लेख | | लेखक |
|---|---|---|---|
| (a) | आमच्या देशाची स्थिती | (i) | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |
| (b) | बाँबगोळ्यांचा खरा अर्थ | (ii) | शिवराम महादेव परांजपे |
| (c) | 'देशाचे दुर्दैव' | (iii) | बाळ गंगाधर टिळक |
| (d) | 'एक चमत्कारिक खेडेगाव' | (iv) | विष्णु कृष्ण चिपळूणकर |

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (B) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (C) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (D) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

12. “भारतीय नाट्यशास्त्र’ या ग्रंथात गोदावरी केतकर यांनी नाट्यशास्त्राच्या अंगोपांगांची विवेचक व सविस्तर चर्चा केली आहे.”

(A) वरील विधानातील ग्रंथनाम चुकीचे आहे.

(B) वरील विधानातील लेखिकेचे नाव चुकीचे आहे.

(C) वरील विधान संपूर्णत: बरोबर आहे.

(D) उल्लेखित ग्रंथ हा भरताच्या नाट्यशास्त्राचे भाषांतर आहे.

13. नामदेवांच्या साधना-मार्गातील वाटचालीच्या दृष्टीने पुढील अभंगांचा क्रम लावा.

(a) “अमृताहुनी गोड नाम तुझें देवा। मन माझें केशवा कां बा नेघे।।”

(b) “त्वरें धावोनिया आलासे गोविंद। सावध सावध नामदेवा।।”

(c) “निद्रिस्ताचे शेजे सर्प का उर्वशी। तैसें विषयासी मानूं आम्ही।।”

(d) “पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारां। पतितपावन नव्हेसि म्हणुनी जातों माघारां।।”

(A) (a) - (d) - (c) - (b)

(B) (a) - (c) - (b) - (d)

(C) (a) - (b) - (c) - (d)

(D) (a) - (d) - (b) - (c)

14. ‘‘रीतिरात्मा काव्यस्य।’’ हे वचन कोणाचे आहे ?

(A) वामन (B) आनंदवर्धन

(C) अभिनवगुप्त (D) क्षेमेंद्र

15. पुढीलपैकी कोणत्या साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे ?

(A) ना.सी. फडके, वि.वा. शिरवाडकर आणि विंदा करंदीकर

(B) वि.स. खांडेकर, वि.वा. शिरवाडकर आणि विंदा करंदीकर

(C) वि.स. खांडेकर, बा.भ बोरकर आणि विंदा करंदीकर

(D) वि.स. खांडेकर, वि.वा. शिरवाडकर आणि मंगेश पाडगावकर

16. श्रीगोविंदप्रभूंचे वास्तव्य कोणत्या गावी होते ?

(A) पैठण
(B) डोमेग्राम
(C) ऋद्धिपूर
(D) माहूर

17. पुढीलपैकी कोणत्या गटातील सर्व ग्रंथ श्रीधरांनी लिहिलेले आहेत ?

(A) 'श्रीरामविजय', 'हरिविजय', 'शनिमाहात्म्य'

(B) 'श्रीरामविजय', 'गुरुचरित्र', 'पांडवप्रताप'

(C) 'व्यंकटेशस्तोत्र', 'हरिविजय', 'पांडवप्रताप'

(D) 'श्रीरामविजय', 'हरिविजय', 'पांडवप्रताप'

18. "शुद्ध कसे बोलावे आणि शुद्ध कसे लिहावे ते व्याकरण शिकल्याने समजते",

अशी व्याकरणाची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) दादोबा पांडुरंग तर्खडकर
(B) मोरो केशव दामले
(C) विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
(D) गोविंद कृष्ण मोडक

19. सौंदर्याचे अस्तित्व वस्तुनिष्ठ असले तरी सौंदर्याचा प्रत्यय व्यक्तिनिष्ठ असतो आणि साहित्यसमीक्षा ही प्रत्ययावर आधारित असते म्हणून –

(A) ती कधीच वस्तुनिष्ठ बनू शकत नाही.

(B) लयसंबंधांना प्रमाण मानून ती वस्तुनिष्ठ बनण्याचा प्रयत्न करू शकते.

(C) ती सौंदर्याचे अस्तित्व नाकारते.

(D) ती सौंदर्याच्या अस्तित्वाला प्रत्ययनिष्ठ मानून चालते

**20.** नाथमाधव, साधुदास, रामतनय ही कादंबरीकारांनी स्वीकारलेली टोपणनावे आहेत तसेच ठणठणपाळ हेही कादंबरी लेखनासाठीच स्वीकारलेले टोपणनाव आहे.

(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

**21.** पुढील कादंबऱ्या कालानुक्रमे लिहा.

'मुक्तात्मा', 'क्रौंचवध','दौलत', ' रणांगण'

(A) 'दौलत', 'मुक्तात्मा', 'रणांगण', 'क्रौंचवध'

(B) 'मुक्तात्मा', 'रणांगण', 'दौलत', 'क्रौंचवध'

(C) 'दौलत', 'क्रौंचवध', 'मुक्तात्मा', ' रणांगण',

(D) 'मुक्तात्मा', 'क्रौंचवध','दौलत', ' रणांगण',

**22.** नाटके व नाटककार यांच्या जोड्या लावा–

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मोरूची मावशी | (i) | मो. ग. रांगणेकर |
| (b) | कुलवधू | (ii) | मुक्ताबाई दीक्षित |
| (c) | जुगार | (iii) | प्र. के. अत्रे |
| (d) | ब्रह्मकुमारी | (iv) | विश्राम बेडेकर |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (B) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (C) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (D) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

23. ‘विचित्रपुरी’ या कादंबरीचा कर्ता कोण ?

(A) केशव लक्ष्मण जोरवेकर

(B) बाबा पद्मनजी

(C) ना.ह. आपटे

(D) लक्ष्मण मोरेश्वर हळबे

24. परशुरामपंततात्या गोडबोले यांनी ‘नवनीत’ संपादित केले आणि ‘अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी’ हे पुस्तकही रचले.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) विधानाचा उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान चूक

25. ‘ऑथेल्लो’ या नाटकाचा ‘झुंजारराव’ हा अनुवाद कोणी केला ?

(A) न. चिं. केळकर

(B) वासुदेवशास्त्री खरे

(C) गो. ब. देवल

(D) गो. वा. कानिटकर

26. ‘कसकस’, ‘चळाचळा’, ‘लाललाल’, ‘टकटक’ या शब्दांना काय म्हणतात ?

(A) अंशाभ्यस्त शब्द

(B) सामासिक शब्द

(C) अव्यये

(D) पूर्णाभ्यस्त शब्द

27. जेव्हा उपवाक्ये ‘पण’ ‘परंतु’ या अव्ययांनी जोडलेली असतात,

तेव्हा त्या वाक्यांना काय म्हणतात ?

(A) विकल्पबोधक वाक्य

(B) समुच्चयबोधक वाक्य

(C) न्यूनत्वबोधक वाक्य

(D) परिणामबोधक वाक्य

28. ‘वडाची साल पिंपळाला’, ‘दरसाल दर शेकडा’, यांसारख्या वाक्यांतील रूपिका रूपदृष्ट्या समान असतील, पण अर्थदृष्ट्या समान नसतील, तर त्यांच्यात काय आहे असे म्हणतात ?

(A) रूपिकान्तर
(B) व्यवच्छेदक विनियोग
(C) आवृत्तिक्षमता
(D) वैकल्पिक रूपिका

29. बाह्यगत भाषा (externalized language) व अंतर्गत भाषा (Internalized language)

यांपैकी अंतर्गत भाषेवर भाषावैज्ञानिकांनी लक्ष केंद्रित करायला हवे, हे प्रतिपादन कोणी केले ?

(A) सोस्यूर
(B) ब्लूमफील्ड
(C) याकोबसन
(D) चॉम्स्की

30. कुलसाम्याची (family resemblance) संकल्पना कोणी मांडली ?

(A) विट्‌गिन्स्टाइन
(B) बाख्तिन
(C) टेरी इगल्टन
(D) रेने वेलेक

31. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या लावा.

(a) काव्यालंकार — (i) आनंदवर्धन
(b) ध्वन्यालोक — (ii) अभिनवगुप्त
(c) वक्रोक्तिजीवित — (iii) भामह
(d) अभिनवभारती — (iv) कुंतक

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (B) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (C) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (D) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

**32.** सिद्धान्त व विचारवंत यांच्या जोड्या लावा

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्रेरणा संतुलन | (i) | जेकस डेरिडा |
| (b) | स्वप्नसिद्धान्त | (ii) | सिमॉन द बॉव्ह |
| (c) | विरचनावाद | (iii) | आय ए रिचर्डस |
| (d) | स्त्रीवाद | (iv) | सिग्मंड फ्रॅाईड |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (B) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (C) | (iv) | (i) | (ii) | (iv) |
| (D) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

**33.** पुढील पद्यपंक्ती कोणाच्या कवितेतील आहेत ?

"पाऊस कधीचा पडतो झाडांची हलती पाने

हलकेच जाग मज यावी दु:खाच्या मंद सुराने"

(A) मंगेश पाडगावकर

(B) ग्रेस

(C) बाल कवी

(D) यशवंत मनोहर

**34.** पुढील पद्यपंक्ती कोणत्या पंडित कवीच्या आहेत ?

"तदितर खग भेणें वेगळाले पळाले

उपवनजलकेली जे कराया मिळाले।

स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो

कठिण समय येतां कोण कामास येतो।।

(A) मोरोपंत

(B) मुक्तेश्वर

(C) वामन पंडित

(D) रघुनाथ पंडित

**35.** मराठीत अनुवादित झालेल्या नाट्यकृती व मूळ नाटककार यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | 'आधेअधुरे' | (i) | गिरीश कर्नाड |
| (b) | 'नागमंडल' | (ii) | बादल सरकार |
| (c) | 'एवम् इंद्रजित' | (iii) | मोहन राकेश |
| (d) | 'राजमुकुट' | (iv) | वि.वा. शिरवाडकर |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (B) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (C) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (D) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

**36.** उसळ, कोशिंबीर, शिकेकाई हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले ?

(A) कन्नड (B) तमिळ

(C) तेलुगु (D) कोकणी

**37.** पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमांनुसार आहे ?

(A) श्रेष्ठकनीष्ठबुद्धी (B) श्रेष्ठकनिष्ठबुद्धि

(C) श्रेष्ठकनिष्ठबुद्धी (D) श्रेष्ठकनीष्ठबुद्धि

**38.** पुढीलपैकी कोणत्या पुस्तकास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला नाही ?

(A) 'युगान्त' (B) 'झोंबी'

(C) 'सलाम' (D) 'कोसला'

**39.** तगारा, देराणि, सालिस् हे शब्द मराठीच्या कोणत्या बोलीतील आहेत ?

(A) डांगी (B) अहिराणी

(C) नागपुरी (D) वऱ्हाडी

**40.** 'राजा लियर' ही अनुवादित नाट्यकृती कोणाची ?

(A) कृ. प्र. खाडिलकर
(B) वि. वा. शिरवाडकर
(C) गो. वि.करंदीकर
(D) विजय तेंडुलकर

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा -**

शेवटी आपण हेही लक्षात घेतलं पाहिजे, तुम्ही किती जरी विरोध केला तरी जागतिकीकरण व्हायचं असलं तर होईल. एकच भाषा यायची असली तर येईल. इंग्रजी राष्ट्रभाषा व्हायची असली तरी होईल. पण आपला हा नैतिक हक्क आहे, की याला विरोध करणं. मी मधे ठामपणे उभा राहिलो तर माझ्यापलीकडे मी ते किरण जाऊ देणार नाही, अशी जर प्रत्येकाने परिस्थिती निर्माण केली तर कदाचित आपल्याला देशी भाषा वाचवता येतील आणि छोट्या छोट्या देशी संस्कृती वाचवता येतील. ज्याला आपण बहुसांस्कृतिकता म्हणतो; ते आपलं वैभव आहे, वारसा, परंपरा आहे. मूल्य आहे. यूनेस्कोनं ह्यूमन राइट्स रेकॉर्डमध्ये हीसुध्दा एक कसोटी घातली पाहिजे. ह्या कलमांमुळे आपला देश इंग्लंड, अमेरिका वगैरेंच्या बराच वर जाईल. परंतु भाषा नाहीशी करणारे नेमके हेच लोक युनेस्कोमध्ये कसोट्या लावणारे आहेत. ते अशा त्यांना न परवडणाऱ्या कसोट्या घालू देणार नाहीत. ते म्हणतीलच की बहुभाषिकत्वाचा, बहुसांस्कृतिकतेचा मानवी हक्कांशी संबंध काय येतो ? जे मरायचे असले ते मरतील! आपण आपली इंग्रजी भाषा रेटत राहायची. आज अतिशय उच्च विद्या विभूषित हिंदुस्थानी इंजिनिअर डॉक्टरलासुध्दा अमेरिकेत जायचं असेल तर त्याला इंग्रजीची परीक्षा द्यावी लागते. ती परीक्षा दिल्याशिवाय शिरू देत नाहीत. इतकं काटेकोर भाषिक धोरण या तथाकथित जागतिकीकरण देणाऱ्या तिकडच्या सर्वच देशांमध्ये सर्रास लावलं जातं आणि आपण जे उदारमतवाद म्हणून या सगळ्या भाषा सांभाळत आहोत, त्यांना वाईट दिवस आले आहेत.

**41.** जागतिकीकरणाच्या संदर्भात आपला नैतिक हक्क कोणता ?

(A) जे होईल ते होऊ देणे.
(B) जागतिकीकरणाला विरोध करणे.
(C) ठाम उभे राहाणे.
(D) इंग्रजी राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारणे.

**42.** देशी भाषा कशा वाचवता येतील ?

(A) माझ्यापलीकडे मी इंग्रजीच्या आग्रहाचा किरणही जाऊ देणार नाही असे ठरवणे.

(B) देशी भाषांचा उपयोग करणे

(C) छोट्या छोट्या देशी संस्कृती वाचवणे.

(D) आपली मूल्ये जपणे.

**43.** आपले वैभव कोणते आहे ?

(A) आपला वारसा

(B) इंग्रजी भाषा

(C) आपली बहुसांस्कृतिकता

(D) मानवी हक्क

**44.** कशामुळे आपला देश इतरांच्या वर जाईल ?

(A) इंग्रजीस विरोध करण्याने.

(B) वारसा, परंपरा, मूल्ये या कसोट्या यूनेस्कोने ह्यूमन राइट्स रेकार्डमध्ये समाविष्ट करण्याने.

(C) इंग्लंड, अमेरिका यांच्या पुढे जाण्याने.

(D) परदेशी जात राहाण्याने.

**45.** जागतिकीकरणाचा आग्रह धरणाऱ्या देशांत कोणते भाषिक धोरण स्वीकारले गेले आहे?

(A) वारसा तपासण्याचे.

(B) इंग्रजीची परीक्षा घेण्याचे.

(C) उदारमतवादी वर्तनाचे.

(D) यूनेस्कोच्या नियमानुसार वागण्याचे.

**46.** पुढील नियतकालिके केव्हा सुरू झाली ते योग्य कालक्रमानुसार सांगा

काळ, विविधज्ञान विस्तार, निबंधमाला

(A) निबंधमाला, विविधज्ञानविस्तार, काळ

(B) विविधज्ञानविस्तार, निबंधमाला, काळ

(C) काळ, निबंधमाला, विविधज्ञानविस्तार

(D) निबंधमाला, काळ, विविधज्ञानविस्तार

**47.** उत्पादनाची जाहिरात करण्यामागे कोणता हेतू नसतो ?

(A) उत्पादनाची माहिती सांगणे.

(B) उत्पादन कोठे मिळते ते सांगणे.

(C) मॉडेलिंग करणाऱ्या व्यक्तीला प्रसिद्धी देणे.

(D) उत्पादनविक्रीची व्यवस्था स्पष्ट करणे.

**48.** भाषणाच्या वृत्तान्तात कोणता घटक महत्त्वाचा मानला जातो ?

(A) श्रोत्यांचा प्रतिसाद

(B) मुख्य वक्त्याचे भाषण

(C) वृत्तान्त कथनकर्त्याचे नाव

(D) सभामंडपाची व्यवस्था

**49.** पुढील शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले ?

कायदा, सामोसा, हवालदार

(A) फारसी
(B) उर्दू
(C) अरेबिक
(D) हिंदी

**50.** 'कांटची सौंदर्यमीमांसा' व 'क्रोचेचे सौंदर्यशास्त्र' या दोन ग्रंथांचे लेखक कोण ?

(A) नरहर कुरूंदकर
(B) प्रभाकर पाध्ये
(C) रा. भा. पाटणकर
(D) सुरेंद्र बारलिंगे

- o O o -

**Space For Rough Work**